कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## परिपत्रक क्रमांक : १७४/२०२०

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक व
विद्यापीठ परिसरातील सर्व प्रशाळांचे संचालक/ विभागप्रमुख,

**विषय :- महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ प्रशाळा यातील कामकाजाबाबत.**

**संदर्भ :-** (१) शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र.डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीआयएसएम-१/ दि.३१ मे,२०२०.
(२) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.१६४/२०२० दि.२२.०५.२०२०
(३) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १६६/२०२० दि.०१.०६.२०२०
(४) शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र.डीएमयु- २०२०/सीआर-९२/डीआयएसएम-१/ दि.०४ जून,२०२०.

कृपया वरील संदर्भीय आदेश/परिपत्रकांचे अवलोकन व्हावे.

शासनाने कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत आपणास वेळोवेळी विद्यापीठाच्या विविध परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

संदर्भांकित विद्यापीठ परिपत्रक क्र.२ अनुसार विद्यापीठातील सर्व प्रशाळा, शैक्षणिक विभाग यांचे संचालक / विभाग प्रमुख, शिक्षक तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था मधील सर्व संबंधीत शिक्षकांना उन्हाळी सुट्यांचा कालावधी **दि. १४ जून २०२०** पर्यन्त ग्राह्य धरण्यात यावे असे कळविण्यात आले होते.

शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र.डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीआयएसएम-१/ दि.३१ मे,२०२० अधिन राहून विद्यापीठातील सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभाग आणि विद्यापीठाचे उपकेंद्रे तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था **दिनांक ०१ जून,२०२० ते ३० जून,२०२०** या कालावधीत बंद रहातील या बाबतचे परिपत्रक क्र.१६६/२०२० निर्गमित करण्यात आले होते.

संदर्भीय शासन आदेश क्र. ४ मधील (g) अनुसार विद्यापीठ / महाविद्यालये, यातील शिक्षकांना अशैक्षणिक काम जसे, उत्तर पत्रिका तपासणे, निकाल तयार करणे व जाहिर करणे, इ-कन्टेंट तयार करणे, ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे कामकाज करणे, पुढील शैक्षणिक वर्षातील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम हे Swayam/MooC/NPTEL यांच्या अभ्यासक्रमाशी Mapping करणे व वेगवेगळे अभ्यासक्रम ऑनलाईन पध्दतीने शिकविण्याची तयारी करणे इ. कामे करण्यासंदर्भात आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त सूचना विचारात घेऊन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे सर्व शिक्षक तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक प्रशाळांचे संचालक, शिक्षक यांनी वरील संदर्भीय परिपत्रक/शासन निर्णयांची **दि. ३० जून,२०२०** (ताळेबंदी) पर्यन्त काटेकोरपणे अंमलबजावणी आपल्या स्तरावरून करावी. तसेच ताळेबंदीच्या (लॉकडाऊन) कालावधीत (work from home) च्या अधिन राहून संबंधीत विभाग प्रमुख / नियंत्रक अधिकारी यांनी संबंधीतांना अशैक्षणिक व प्रशासकीय कामकाजास महाविद्यालयात / विद्यापीठात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे बंधनकारक राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढे..२.. वर

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

Scanned with CamScanner

तेव्हा, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थाचे संचालक, विद्यापीठ प्रशाळांचे संचालक, विभागप्रमुख व सर्व शिक्षक यांनी कार्यालयात उपस्थिती दरम्यान आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय मार्गदशक सूचना तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**सोबत :-**

शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र.डीएमयु- २०२०/ सीआर- ९२/डीआयएसएम-१/ दि.०४ जून,२०२०.

जा. क्र. कबचौउमवि/२/कोरोना(कोविड-१९)/२१४ /२०२०
दि. १३.०६.२०२०

आदेशान्वये,

(प्रा. भा. व्यं. पवार)
**प्र. कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य व अधिष्ठाता, कबचौउमवि-जळगाव. २. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव. ३. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव. ४. मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१. ५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव. ६. मा. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि-जळगाव ७. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि-जळगाव.



Scanned with CamScanner